# कृषि विज्ञान केंद्र

## मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, खरपुडी, जालना

## विकसित कृषि संकल्प अभियान, खरीप - २०२५

# सुधारीत मोसंबी लागवड तंत्रज्ञान

### जमिनीची निवड :

मोसंबी बागेच्या दिर्घायुष्यासाठी योग्य जमिनीची निवड करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर शेतीतून माती व पाण्याचा नमूना घेऊन माती परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

१) जमिनीचा सामू ६.५ ते ८.० असावा.

२) जमिनीत मुक्त चून्याचे प्रमाण १०% पेक्षा जास्त असू नये, अशा जमिनीत सुक्ष्मअन्नद्रव्याची व स्फुरदाची कमतरता आढळते.

३) जमीन मध्यम भारी तसेच किमान एक मिटर खोल व उत्तम निचऱ्याची असावी. फार हलकी, भारी, चिवट जमिनीत लागवड करू नये.

### मोसंबीची सुधारीत जात :

न्यूसेलार (रंगपूर खुंट वापरावा)

* या जातीची उत्पादन क्षमता इतर जातींच्या तुलनेत दुप्पट आहेत.
* फळांची साल चोपडी, पातळ व चमकदार असल्यामुळे फळांचा रंग आकर्षक व उठावदार वाटतो. त्यामुळे फळांना जास्त भाव मिळतो.
* फळांची साल घट्ट असून फळे तोडणीनंतर जास्त टिकतात.
* रंगपूर खुंटावरील मोसंबीची झाडे समाधानकारक वाढतात. याशिवाय रंगपूर खुंटावरील झाडे विषाणूजन्य रोगांना प्रतिकारक असतात. तसेच जमिनीतील अनेक दोषावर जसे कॅल्शियम क्लोराईट, बायोकार्बोनेट आणि एकूण क्षार, आम्लनिर्देशांक (सामू) याचा रंगपूर खुंटावर विशेष परिणाम होत नाही. त्यामुळे बागेचे आयुष्य वाढते.

### लागवड व अंतर :

* मोसंबीची लागवड चौरस पध्दतीने १८ बाय १८ फुटांवर करावी. त्यासाठी उन्हाळ्यात ३ फुट लांब ३ फुट रूंद व ३ फुट खोलखड्डा घ्यावा.
* लागवडीसाठी तयार केलेल्या खड्ड्यामध्ये चांगले कुजलेले शेणखत १५ ते २० किलो, सिंगल सुपर फॉस्फेट १ किलो व १०० ते १५० ग्रॅम कार्बारील भुकटी १०% जमिनीच्या पृष्ठभागावरील चांगल्या मातीत किंवा गाळाच्या मातीमिश्रणाने जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच भरावी.
* कलमांचा जोड जमिनीपासून २० ते २५ सें.मी. उंच ठेवावा. कमलांची लागवड सायंकाळी किंवा सूर्यास्तापूर्वी करावी.
* कलमलावल्यानंतर मुळाभोसवी मातीचांगली दाबून घ्यावी जेणेकरून माती पोकळ राहणार नाही तसेच कलमांच्या डोळ्याची दिशा वाऱ्याच्या दिशेस ठेवावी.
* कलमांची लागवड करतांना ०.२ टक्के तीव्रतेच्या बुरशीनाशक द्रावणात तीन मिनीटे बुडवून ठेवावी.

### सिंचन व बहर व्यवस्थापन :

उन्हाळ्यात दर ५ दिवसांनी तर हिवाळ्यात दर ८ ते १० दिवसांनी नियमीतपणे पाणी द्यावे.

बहर व्यवस्थापन मोसंबीमध्ये मृग व अंबिया बहार दोन्हीही घेता येतात परंतू आंबिया बहर हा खात्रीचा बहर असतो. या बहरामध्ये फळांचा रंग आकर्षक व प्रत चांगली राहते, भाव चांगला मिळतो, फळ वजनाने जास्त असते, बागेचे आयुष्य वाढते.

बहर धरण्यासाठी जमिनीच्या प्रकारानूसार पाणी बंद ठेवावेत त्या करीता हलक्या जमिनीस ३५ ते ४५ दिवसाचा ताण द्यावा. मध्यम जमिनीस ४५ ते ६० दिवसाचा ताण द्यावा तर भारी जमिनीस ५५ ते ६५ दिवसाचा ताण द्यावा. साधारणत: २५ ते ३० टक्के पानगळ झाल्यास ताण बसला असे समजावे.

अति उष्णतेपासून तसेच डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी वर्षातून किमान दोन वेळेस ऑक्टोबर व मे मध्ये फळझाडाच्या खोडास बोर्डो पेस्टचा (१ किलो मोरचूद, १ किलो कळीचा चूना आणि १० लिटर पाणी) लेप द्यावा.

### आंबियाबहरासाठी खत व्यवस्थापन

**मोसंबी बागेस मुख्य अन्नद्रव्ये निर्धारित खताचा वापर (वर्षातून ३ वेळेस)**

| झाडाचे वय वर्ष | खते देण्याची वेळ | शेणखत (कि/झाड) | नत्र(ग्रॅ) (युरिया/झाड) | स्फुरद (सिंगल सुपर फॉस्फेट) (ग्रॅ/झाड) | पालाश (म्युरेट ऑफ पोटॅश) (ग्रॅ/झाड) |
|---|---|---|---|---|---|
| पहिले वर्ष | जून<br>ऑक्टोबर<br>फेब्रुवारी | १० | १००<br>१००<br>१०० | ४०० | १०० |
| दुसरे वर्ष | जून<br>ऑक्टोबर<br>फेब्रुवारी | २० | २००<br>२००<br>२०० | ८०० | २०० |
| तिसरे वर्ष | जून<br>ऑक्टोबर<br>फेब्रुवारी | ३० | ३००<br>३००<br>३०० | १२०० | ३०० |
| चौथे वर्ष | जून<br>ऑक्टोबर<br>फेब्रुवारी | ४० | ४००<br>४००<br>४०० | १६०० | ४०० |
| पाचवे वर्ष व त्यापुढे | ताण तोडल्यास | ५० | ७५० | २००० | ५०० |
| | फळे वाटाण्या एवढे झाल्यास | | ७५० | | |

**मातीतून व फवारणीद्वारे द्यावयाचे सुक्ष्म अन्नद्रव्ये मात्रा**

| मातीतून खताच्या मात्रा ग्रॅम प्रतिझाड/वर्ष | | फवारणीद्वारे |
|---|---|---|
| खत | वजन (ग्रॅम) | |
| जस्त सल्फेट | २५० - ३०० | ०.५ टक्के |
| फेरस सल्फेट | २०० - २५० | ०.२५ टक्के |
| मॅग्नीज सल्फेट | २०० - ३०० | ०.५ टक्के |
| तांबे | १०० - १५० | १ कि. चुना<br>१ कि. कॉपर सल्फेट<br>५०० लिटर पाण्यात<br>मिसळून |
| अमोनियम मॉलीबडेट | २५ - ५० | ०.४ - ०.५<br>(सोडियम मोलीब्डेट) |
| बोरॉन | २५ - ५० | ०.२ टक्के |

## मोसंबीतील किड व्यवस्थापन :

**पाने खाणारी अळी :** क्विनॉलफॉस २० ईसी ३० मि.ली. किंवा थायोडीकार्ब ७० डब्ल्यूपी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**पाने पोखरणारी अळी :** इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात प्रादूर्भाव आढळताच फवारणी करावी.

**सिट्रस सायला :** इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल १ मि.ली. किंवा थायोमिथॉक्झॉन २५ डब्ल्यूजी १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून नवती फुटण्याच्यावेळी म्हणजे जानेवारी-फेब्रुवारी, जुन-जुलै आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये सायलाचा प्रादुर्भाव दिसताच करावा. गरज पडल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी पण किटकनाशक बदलून वापरावे.

**काळीमाशी :** क्लोरोपायरीफॉस २० ईसी १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**मावा :** प्रादूर्भाव आढळल्यानंतर डायमेथोएट ३० ईसी १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**पिठ्या ढेकूण :** डायमेथोएट ३० ईसी १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फुल किडे :** पाने, कळ्या उमलण्याच्या वेळी, लहान फळावर आणि सभोवतालच्या गवतावर डायमेथोएट ३० ईसी १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी.

**साल पोखरणारी अळी :** छिद्रातील अळी जाड, अनुकुचीदार तारेचा वापर करून मारावी. प्रादुर्भावग्रस्त झाडाच्या फांद्या/खोडावरील अळीने तयार केलेल्या जाळ्या काढून साफ कराव्यात त्यानंतर कापसाचा गोळा मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल ३ मि.ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात भिजवून खोडातील छिद्रात घालावेत हे द्रावण छिद्रात टाकण्यासाठी इंजेक्शनचा वापर करावा तसेच फवारणी संपूर्ण झाडावर करावी.

**कोळी :** पाण्याचा ताण पडू देऊ नये, ५ टक्के निंबोळी अर्काचा वापर करावा. प्रादूर्भाव दिसताच मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावेत.

**फळातील रस शोषण करणारा पतंग :** बागेतील गुळवेल, वासनवेल इत्यादी काढून टाकावी व मिथाईल युजेनॉल चे कामगंध सापळे एकरी ४ या प्रमाणे लावावेत.

## मोसंबीतील रोग व्यवस्थापन :

**मोसंबीतील आरोह (डायबॅक) होण्याची प्रमुख कारणे :** अयोग्य जमिनीची निवड, अयोग्य कलमांची निवड, अशास्त्रीय पध्दतीने बागेची निगा व मशागत, अन्नद्रव्याचा अपुरा असमतोल पुरवठा व पिकसंरक्षणाकडे दूर्लक्ष. विविध विषाणूजन्य, बुरशीजन्य आणि काही जिवाणूजन्य रोग डायबॅक साठी कारणीभूत आहेत यामध्ये ट्रिस्टीझा, ग्रीनिंग व फायटोप्थोरा हे महत्वाचे रोग आहेत. रोगांव्यतिरीक्त विविध किडी (मावा, सिट्रस सायला, सालखाणारी अळी) व सुत्रकृमीमुळे सुध्दा डायबॅक होऊ शकतो.

**१) डिंक्या :** झाडाचे रोगग्रस्त साल काढून ती जागा पोटॅशियम परमँगनेट (१ टक्के) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्याच्या द्रावणाने निर्जंतूक करावी. त्यावर बोर्डोपेस्ट लावावेत.

**२) पायकुज किंवा मुळकुज :** सायमोक्झॅनील + मॅन्कोझेब २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रति झाड १० ते २० लिटर या प्रमाणे आळवणी करावी.

**३) शेंडेमर :** पावसाळ्यापूर्वी झाडावरील रोगट व वाळलेल्या फांद्या (साल) काढून जाळाव्यात. साल काढल्यानंतर कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.३ टक्के ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे १५ ते २० दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

**४) कोळशी :** डायमेथोएट १.५ मि.ली. अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड (०.३ टक्के) ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

**५) फळकाढणीपूर्वी देठकुज :** जमिनीवरील पडलेली व झाडांवर असलेली रोगग्रस्त फळे गोळाकरूण नष्ट करावीत व बहर धरण्यापूर्वी झाडावरील वाळलेल्या फांद्या काढून नष्ट कराव्यात.




* लेखन व संकलन *

सुनिल कळम (विषय विशेषज्ञ, उद्यानविद्या) मो. ९०२८२५४९४९

श्रीकृष्ण सोनुने (वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) मो. ९०२८२५४९४६


संदर्भ : व.ना.म.कृ.वि.,परभणी